डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
परिपत्रक क्र.०२/स्व.वि.सा.प्र.वि./२०२१/१००९

या परिपत्रकानुसार सर्व शैक्षणिक/प्रशासकीय विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, विद्यापीठातील विविध शैक्षणिक/प्रशासकिय विभाग, सर्व विद्यार्थी वसतीगृहे, अतिथिगृह, नाट्यगृह व इतर इमारती आणि परिसर स्वच्छतेसाठी दि.०२/०८/२०२१ रोजी पासुन **मे.डी.एम.एन्टरप्राईजेस, वाशी, नवी मुंबई** या कंत्राटदार/एजन्सीची नियुक्ती केलेली आहे.

सदरील कंत्राटदारामार्फत नियुक्त केलेल्या कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांवर देखरेख करणेबाबतची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची आहे. विद्यापीठ परिसरात नियुक्त केलेल्या सर्व कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांना विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक/प्रशासकिय विभाग, सर्व विद्यार्थी वसतीगृह व इतर इमारती तथा विद्यापीठ परिसराच्या स्वच्छतेसंबंधी संपूर्ण इतभूत माहिती असणे/होणे आवश्यक आहे.

तथापि स्वच्छतेच्या कामाचा दर्जा गुणवत्तापूर्ण असावा असे अपेक्षित असुन विभागाच्या स्वच्छतेसाठी कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांची जरी एक किंवा दोन महिन्याने कंत्राटदाराने विभागनिहाय अंतर्गत बदली केल्यास त्या कर्मचाऱ्याच्या जागी बदलून आलेल्या सफाई कर्मचाऱ्याकडून स्वच्छतेचे काम होत असते.

त्या अनुषंगाने सफाई कर्मचाऱ्याची आपल्या विभागातून बदली झाल्यास तोच कर्मचारी परत मिळावा यासाठी आग्रही असु नये पुरविलेल्या सफाई कर्मचाऱ्याकडून विभागाचे स्वच्छतेचे समाधानकारक करून घ्यावे. तसे होत नसल्यास सामान्य प्रशासन विभागास कळवावे.

तसेच या विभागाचे यापूर्वीचे परिपत्रक क्र.०१/स्व.वि.सा.प्र.वि./२०२१/६७० दि.०३/०९/२०२१ रोजीच्या परिपत्रकाची दर महा अंमलबजावणी व्हावी.

तरी सर्व शैक्षणिक/प्रशासकीय विभागप्रमुखांनी सदरील परिपत्रक आपल्या विभागातील संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

विद्यापीठ प्रांगण)(
औरंगाबाद ४३१००४)(
संदर्भ:सामान्य प्रशासन विभाग २०२१-२२/१००९)(
दिनांक: १५/११/२०२१)(

कुलसचिव